**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ**
कृषि नगर, वसमत रोड,
परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| **ई-मेल** | **: reg_mau@rediffmail.com** | **दूरध्वनी** | **: (०२४५२) २२९७५५** |
| **वेबसाईट** | **: www.vnmkv.ac.in** | **फॅक्स** | **: (०२४५२) २२९७५५, २२३५८२** |


क्र.२०२६/वा.अहवाल(५३)/साप्रवि-७/७७
दिनांक : ०७.०१.२०२६

**स्मरणपत्र-३**

प्रति,
सर्व कार्यालय प्रमुख,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी.

विषय : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठीचा सन २०२४-२०२५ (५३ वा) वार्षिक अहवालाकरीता माहिती सादर करण्याबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र क्र.दि.१०.०७.२०२५
२) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र क्र.दि.१४.११.२०२५

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ चे कलम ६९ आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० चे परिनियम ११४ मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या वार्षिक अहवालास कार्यकारी परिषदेची मान्यता घेवून विधीमंडळास सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रात सन २०२४-२०२५ या वर्षात झालेल्या कार्यासंबंधीचे वार्षिक अहवाल मराठी व इंग्रजीत तयार करुन आपल्या नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत संचालक सशोधन, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्याकडे **दिनांक २५.०१.२०२६ पर्यंत** पाठवावेत.

सन २०२३-२०२४ या वार्षिक अहवालाच्या धर्तीवर अहवाल लेखन करुन सन २०२४-२०२५ या वर्षाची माहिती पाठवावी. अहवालाच्या मांडणी पध्दतीत कोणताही बदल अपेक्षित नाही. वार्षिक अहवालात संशोधन पध्दती, साहित्य (Material and Method) इत्यादी बाबतची सविस्तर माहिती अपेक्षित नाही. त्या ऐवजी संशोधन कार्याची उपलब्धी व शिफारशीबाबतचा अंतर्भाव त्यात असावा. याशिवाय संशोधन लेख, मराठी/इंग्रजीतील प्रकाशित लेख, आकाशवाणी व दूरदर्शनवरील प्रसारीत/सादर झालेले कार्यक्रम इत्यादी तसेच विस्तार कार्याची माहिती संकलीत करुन हार्ड व सॉफ्ट कॉपीसह संचालक संशोधन यांना पाठवावी.

प्रकरणी विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(पु.कों.काळे) ७/१/२६
**उपकुलसचिव (प्रशासन)**

प्रत :

१) संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सर्व कार्यालय प्रमुखांकडून प्राप्त झालेली माहिती संकलित करुन वार्षिक अहवालाच्या ३० प्रती अंतीम छपाईपूर्वी कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस्तव

सादर कराव्यात. कार्यकारी परिषदेच्या मान्यतेनंतरच अहवाल छपाईसाठी-संचालक विस्तार शिक्षण यांच्याकडे पाठवावा.

२) संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी विद्यापीठ वार्षिक अहवालास कार्यकारी परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अहवाल छपाईची कार्यवाही करुन सदर अहवालाच्या आवश्यक तेवढ्या प्रती पुस्तक रुपात (हार्ड कॉपीज) व सीडी स्वरुपात शासनास सादर करण्यासाठी तयार ठेवाव्यात.

३) उपकुलसचिव (प्रशासन/परीक्षा/सामान्य प्रशासन) कुलसचिव कार्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना देवून सूचित करण्यात येते की, आपल्या संबंधित वार्षिक अहवालाची माहिती संचालक संशोधन कार्यालयास पाठवावी.

४) मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि परभणी यांना माहितीस्तव.